| MHKO050018652021 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल तारीख | : | ११ | ०९ | २०१९ |
| | नोंदणी तारीख | : | १३ | ०९ | २०१९ |
| | निकाल तारीख | : | ०२ | ०७ | २०२६ |
| | कालावधी | : | वर्ष | महिने | दिवस |
| | | | ०६ | ०९ | २२ |

**भाग – अ**

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.२), इचलकरंजी**
**यांचे न्यायालयात**
( पिठासन अधिकारी - **डी.बी.साठे** )
( घोषित दिनांक – **०२/०७/२०२६**)

**नियमित फौजदारी खटला क्र.२५८/२०१९** **निशाणी क्र.२९**

गुन्हा रजिस्टर नंबर ३०७/२०१८, शिवाजीनगर पोलीस स्टेशन.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी / तक्रारदार** | : | **महाराष्ट्र सरकार**<br>मार्फत-पोलीस निरीक्षक,<br>शिवाजीनगर पोलीस स्टेशन,<br>इचलकरंजी. |
| **अभियोगपक्षातर्फे** | : | श्री. ए.ए. गोपलकर. |
| **आरोपी** | : | **१.राजेंद्र आनंदा नडाळे,**<br>व.व.२९ वर्षे, व्यवसाय– मजूरी,<br>**२. युवराज आनंदा नडाळे,**<br>व.व.२७ वर्षे, व्यवसाय– मजूरी,<br>दोघे रा.जुना चंदूर रोड, बरगेमळा, इचलकरंजी. |
| **आरोपी तर्फे विधीज्ञ** | : | पी. एस. नायडू |

**भाग - ब**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | : | ३१.०८.२०१८ |
| फिर्याद दाखल दिनांक | : | ३१.०८.२०१८ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | : | १३.०९.२०१९ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | : | २७.११.२०१९ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | : | १५.०६.२०२६ |

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखुन ठेवल्याचा दिनांक | : | - |
| न्यायनिर्णय दिनांक | : | ०२.०७.२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | : | - |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्ह्याचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. क. ४२८ अन्वये समायोजित (Set off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | राजेंद्र आनंदा नडाळे, | १२/०९/ २०१८ | १२/०९/ २०१८ | **भा.दं.वि.कलम ३२४,३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये** | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| २ | युवराज आनंदा नडाळे, | १२/०९/ २०१८ | १२/०९/ २०१८ | **भा.दं.वि.कलम ३२४,३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये** | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## भाग – क

सरकार पक्षातर्फे घेण्यात आलेले साक्षीदार / बचाव पक्षातर्फे साक्षीदार/ न्यायालयीन साक्षीदार

### अ) अभियोगपक्ष

| सा.क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १ | बसवराज शिवपुत्र नेसरी | फिर्यादी | २५ |

### ब) बचावपक्ष

| सा.क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| निरंक | | | |

### क) न्यायालयीन

| सा.क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| निरंक | | | |

अभियोगपक्ष / बचावपक्ष / न्यायालय यांचे कागदपत्र निशाणी यादी

### अ) बचावपक्ष

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | २७ | घटनास्थळ पंचनामा आरोपीतर्फे मान्य केला. |
| २ | २८ | जखमींचे प्रमाणपत्र आरोपींनी मान्य केले. |

**<u>ब) अभियोगपक्ष</u>**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | ११ | दोषारोप |
| २. | १२ व १३ | आरोपींचे निवेदन |
| ३. | २४ | फिर्यादी व आरोपी यांची तडजोड पुरशीस |

**क) बचावपक्ष**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| निरंक | | | |

**ड) न्यायालयीन**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| निरंक | | | |

**ई) भौतिक वस्तु**

| अ.क्र. | भौतिक वस्तु क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | | |

## न्या य नि र्ण य
## (दिनांक ०२/०७/२०२६ रोजी घोषित)
## अभियोगपक्षाची हकीगत खालील प्रमाणे -

फिर्यादी बसवराज शिवपुत्र नेसरी यांनी अशी फिर्याद दिली की, फिर्यादी याने आरोपी नं.१ यांचेकडून रू.२,०००/- हात उसने घेतले होते. आठवडयाला रू.३००/- प्रमाणे फिर्यादीने आरोपीचे रू.१४००/- परत दिले होते.दि.३१.०८.२०१८ रोजी सायंकाळी ४.३० च्या सुमारास फिर्यादी आरोपी नं.१ चे रू.३००/- देण्यासाठी गेला असता आरोपी नं.१ याने पैसे न घेता आरोपी नं.२ यांचेशी संगनमत करून आरोपी यांनी फिर्यादीस शिवीगाळ करून लाथाबुक्कयांनी

मारहाण केली. आरोपी नं.२ याने रस्त्यात पडलेला दगड हातात घेवून फिर्यादीचे डोकीत मारून त्यास गंभीर जखमी करून परत मारण्याची धमकी दिली म्हणून फिर्यादीने आरोपींविरूध्द पोलिस ठाणेमध्ये तक्रार दाखल केली.

**२.** फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीवरुन शिवाजीनगर पोलिस स्टेशन, इचलकरंजी गुन्हा रजि.क्र.३०७/२०१८ भा.द.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये गुन्हा दाखल केला. घटनेचा तपास श्री. ए. वाय. मकानदार, पो.हे.कॉ.ब.नं.११२९ यांनी केला, तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब घेतले, घटनास्थळाचा पंचानामा, जप्ती पंचनामा तयार केला, जखमींचे वैदयकिय प्रमाणपत्र हस्तगत केले व आरोपींविरुध्द भा.द.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ प्रमाणे दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले.

**३.** माझे पुर्व पिठासिन अधिकारी यांनी आरोपींचे विरुध्द निशाणी क्र.११ अन्वये भा.द.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे दोषारोप निश्चित केले. त्यानंतर आरोपींनी गुन्हा मान्य नसल्याने कथन करून खटला चालविण्याची विनंती केली. आरोपींविरुध्द पुरावा न आल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(बी) अन्वयेचे निवेदनामध्ये सुट देण्यात आली.

**४.** सरकारपक्षाचा खटला व आरोपीचा बचाव पहाता खालील मुददे माझे समोर उपस्थित झाले त्याचे निष्कर्ष मी कारणामिमांसेसह पुढील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, दि.३१.०८.२०१८ रोजी सायंकाळी ४.३० वाजताचे सुमारास बरगे मळा, गल्ली नं.१, इचलकरंजी येथे आरोपी यांनी संगनमताने फिर्यादी यांना आरोपी नं.२ | |

| | | |
|---|---|---|
| | याने फिर्यादीस दगडा सारख्या घातक हत्याराने मारहाण करून इच्छापुर्वक दुखापत पोहचली व त्याद्वारे भा.द.वि. कलम ३२४ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला ? | **नकारार्थी** |
| २ | वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करून फिर्यादी यांना लाथाबुक्कयांनी मारहाण केली व त्याद्वारे भा.द.वि.कलम ३२३ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला? | **नकारार्थी** |
| ३ | वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करून फिर्यादी यांना प्रक्षोभीत केले व सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा असा आरोपीचा उद्देश होता किंवा तसे होण्याचा संभव असल्याची आरोपीस जाणीव होती व त्याद्वारे भा.द.वि.कलम ५०४ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला? | **नकारार्थी** |
| ४ | वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करून फिर्यादी यांना फौजदारी धाकदपटशा केला व त्याद्वारे भा.द.वि.कलम ५०६ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला? | **नकारार्थी** |
| ५ | अंतिम आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>-का र ण मि मां सा-</u>

**<u>मुद्दा क्र.१ ते ४ करिता -</u>**

**५.** दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकला व पुराव्याचे अवलोकन केले. पुनरावृत्ती टाळण्यासाठी मुद्दा क्र.१ ते ४ हे एकत्रीतरित्या विचारात घेण्यात आले आहेत. फिर्यादी साक्षीदार क्र.१ बसवराज यांना तपासण्यात आले आहे. सदर साक्षीदाराने त्याच्या साक्षीपुराव्यात असे आले आहे की, ते आरोपींना ओळखतात. आरोपी त्यांच्या शेजारी

राहतात. दि.३१.०८.२०१८ रोजी काय घटना घडली हे त्यांना आठवत नाही. असे काही घडले नाही की, दि.३१.०८.२०१८ रोजी ते आरोपींना उसणे घेतले पैसे देण्याकरिता गेले असता आरोपी युवराज याने रस्त्यावर पडलेला दगड घेवून त्यांच्या डोक्यात मारला, त्यांच्या डोक्यातून रक्त येवू लागले ते खाली पडले त्यावेळी आरोपी राजू याने त्यांना लाथाबुक्कयांनी मारहाण केली व वाईटवंगाळ शिवीगाळ करून पुन्हा मारणेची धमकी दिली. सदर साक्षीदाराने फिर्यादीवरील सही ओळखली परंतू फिर्यादीतील मजकुर नाकारला आहे. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास समर्थन केले नाही म्हणुन अभियोगपक्षाच्या विधीज्ञांने सदर साक्षीदाराचा उलटतपास घेतला. परंतु उलटतपासामध्ये अभियोगपक्षाला मदत होईल असा पुरावा अभिलेखावर आला नाही. सदर साक्षीदाराने फिर्यादीमधील मजकुर नाकारलेला आहे. फिर्यादीने उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, फिर्यादीचे व आरोपीचे आपसात कोर्टाबाहेर समझोता झालेला आहे. फिर्यादीने फिर्यादीमधील पुर्ण मजकुर नाकारलेला आहे.

**६.** आरोपींनी घटनास्थळ व जप्ती पंचनामा तसेच जखमींचे वैदयकिय प्रमाणपत्र मान्य केले आहेत. परंतु फिर्यादी व जखमी साक्षीदार यांनी पुराव्यामध्ये त्यांनी घटना तसेच आरोपीने कोणत्या ठिकाणी कशाने मारहाण केली तसेच त्यांनी कोणत्या दवाखान्यामध्ये उपचार घेतले होते हे सांगितलेले नाही. त्यामुळे आरोपींनी घटनास्थळ, जप्ती पंचनामा व वैदयकिय प्रमाणपत्र मान्य केले असले तरी अभियोगपक्षास मदत होईल असा कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. अभियोगपक्ष पंच साक्षीदारांकडून घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिध्द करू शकलेला नाही. प्रस्तुत प्रकरणामध्ये फिर्यादी यांनी अभियोगपक्षास सहकार्य केलेले नाही. फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये आपआपसात समझोता झाला असल्याने सदरचा खटला चालविणे नाही असे कळविले आहे. अभियोगपक्षास सदरहु प्रकरणातील इतर स्वतंत्र साक्षीदार तपासण्यात अपयश आले आहे.

**७.** वरील कारणावरुन असे दिसुन येते की, आरोपी व फिर्यादी यांचे आपसात न्यायालयाबाहेर समजोता झाला आहे. याबाबत पुढील महत्वाची बाब अशी की, फिर्यादी व आरोपी यांनी त्यांच्या सहीनिशी निशाणी क्र.२४ वर तडजोड पुरशीस दाखल केली आहे. तसेच आरोपी नं.२ याने आरोपी नं.१ यांच्याशी संगनमत करून फिर्यादी यांना दगडासारख्या घातक हत्याराने मारहाण करून दुखापत करून फिर्यादी यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ करून फौजदारी धाकदपटशा केला याबाबत काहीही सांगितलेले नाही. अभियोगपक्ष आरोपींविरुध्द लावलेला दोषारोपातील प्रमुख घटक सिध्द करु शकलेला नाही. म्हणुन मी मुद्दा क्र.१ ते ४ चे उत्तर नकारार्थी देवुन मुद्दा क्र.५ साठी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

**१.** आरोपी यांची फौजदारी प्रक्रिया संहिता २४८(१) अन्वये भा.द.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वयेच्या दोषातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

**२.** आरोपींनी त्यांचे बंधपत्र रद्द करण्यात येते.

**३.** आरोपींना निर्देश देण्यात येते की, त्यांनी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७-अ प्रमाणे पुर्तता करावी.

**४.** जप्त मुद्देमाल एक दगड हा मूल्यहीन असल्यामुळे अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावा.

**५.** सदर न्यायनिर्णयाची प्रत जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात यावी.

(निकाल खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात येते आहे.)

Digitally signed by DATTATRAY BHAGWAN SATHE
Date: 2026.07.02 15:30:42 +0530

दिनांक – ०२.०७.२०२६

**(डा.बा.साठे)**
२ रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
इचलकरंजी.